जावक क्रमांक :- ४६०९/२०१८
सहकारनगर पोलीस ठाणे,पुणे शहर
दिनांक :- १३/०८/२०१८

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
यांना सविनय सादर

रिपार्ट :- बी.पी.इंगळे, पो.ना. ६३, सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांसकडुन विनंतीपुर्वक की

विषयः- मयत पुरुषाचा शोध होणेकामी वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, सहकारनगर पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजिस्टर नंबर ७०/२०१८ दिनांक १०/०८/२०१८ मधील बेवारस मयम पुरुष वय अंदाजे ७० वर्षे यांना दिनांक ०९/०८/२०१८ रोजी रात्री २२/०० वा शंकर महाराज उड्डाण पुल धनकवडी पुणे येथे जखमी अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचार कामी दिनांक ०९/०८/२०१८ रोजी रात्री २३/२० वा चे सुमारास ससुन हॉस्पिटल वार्ड क्र.१२ येथे औषधोपचार कामी ॲडमिट केले असता दिनांक १०/०८/२०१८ रोजी रात्री ०१/०० वा चे सुमारास उपचार दरम्यान वार्डात मयत झाले त्यांचा एम एल सी नं. १०१७१/२०१८ व एम एल पी एम नं.३९४८/२०१८ असुन त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे

बेवारस पुरुष मयत इसम वय अंदाजे ७० वर्षे डोक्याचे केस पांढरे बारीक, मिशी पांढरी बारीक, दोन्ही पायांच्या नडग्यांवर पांढ-या कोडाचे डाग, उंची अंदाजे ५ फुट ६ इंच, चेहरा गोलसर, बांधा-सडपातळ, नेसनीस पांढ-या रंगाचा उभ्या रेषा असलेला फुल बाहयांचा शर्ट व राखाडी रंगाची फुल पॅन्ट

येणेप्रमाणे वरील वर्णनांचा अज्ञात मयत पुरुष इसमाचा व त्याच्या नातेवाईकाचा शोध होणेकामी मयत इसमाचा फोटो व माहितीची वर्तमान पत्रात प्रसिध्दी होण्यास विनंती आहे.